आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या श्री. प्रमोद सदाशिव पाटील, अधिक्षक व श्री. चंद्रशेखर नामदेवराव अवझे, कनिष्ठ लिपीक या दोन कर्मचाऱ्यांसाठी निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: अपदे-२०२६/प्र.क्र.२४६/पासु-२
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.
दिनांक: ०२ जुलै, २०२६

वाचा :

१) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि.२१.१२.२०१९**
२) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. असंप-२०२९/प्र.क्र.२९/आरोग्य-३, दि.३१.१२.२०२०**
३) **सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-११२३/प्र.क्र.२९ए/१६-ब, दि.१८.०९.२०२५**

प्रस्तावना :

सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.८९२८/२०१५ (चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दिनांक ६/७/२०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी, रिट याचिका क्र.३१४०/२०१८ मध्ये दि.२८/९/२०१८ च्या आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि.३१/१२/२०१९ पर्यत कार्यवाही करण्याचे आदेश दिले असल्याने अशा कर्मचारी यांची अधिसंख्य पदे निर्माण करुन या अधिसंख्य पदावर कर्मचारी यांना वर्ग करण्याची कार्यवाही करण्याची सूचना दिली आहे. त्यास अनुसरुन आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या श्री. प्रमोद सदाशिव पाटील, अधिक्षक व श्री. चंद्रशेखर नामदेवराव अवझे, कनिष्ठ लिपीक या दोन कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली असून सदर अधिसंख्य पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली अधिसंख्य पदावर कार्यरत असलेल्या श्री. प्रमोद सदाशिव पाटील, अधिक्षक व श्री. चंद्रशेखर नामदेवराव अवझे, कनिष्ठ लिपीक या दोन कर्मचाऱ्यांना दि.०१.०६.२०२६ रोजीचा ०१ दिवसाचा तांत्रीक खंड देऊन दि.०२.०६.२०२६ ते दि.३०.०४.२०२७ पर्यंत ११ महिन्यांच्या कालावधीकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकास सेवानिवृत्त झाले असते त्या

दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर वर्ग करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. अधिसंख्य पदांच्या वेतनावर येणारा खर्च हा संबंधित कर्मचारी सध्या ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या-त्या कार्यालयाच्या वेतनासंबंधीच्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१/१२/२०१९ मधील तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-११२३/प्र.क्र.२९ए/१६-ब, दिनांक १८/०९/२०२५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७०२१४५०४४६११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA PRADEEP PISE

Digitally signed by KAVITA PRADEEP PISE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=895D4DC43BA3105440C0329431446AE8333AB89578925B2D77D3806165DBD487,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=AEEF37624AA6E5EA1AAA99D244C6C2A5F135097E5C07486A35D423835B4EC728, cn=KAVITA PRADEEP PISE
Date: 2026.07.02 17:44:36 +05'30'

(क.प्र. पिसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई/पुणे.
४. संनियंत्रक तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नागपूर.
५. सह संचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग)/ (कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे-६.
६. निवडनस्ती (पायाभुत सुविधा-२).